मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# पिंपरी-चिंचवड महापालिकेचा 44 वा वर्धापन दिन जल्लोषात!

## १२ ऑक्टोबरला मुख्य कार्यक्रम; अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव अन् विविध उपक्रम

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा ४४ वा वर्धापन दिन विविध सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा तसेच अधिकारी-कर्मचारी केंद्रित उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. महानगरपालिकेच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या विकासात्मक वाटचालीचा आढावा घेणे, शहराच्या विकासात योगदान देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करणे तसेच नागरिकाभिमुख प्रशासन अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. महापौर रवि लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धापन दिनाच्या कार्यक्रमांचे नियोजन करण्यात येत आहे.**



महानगरपालिकेचा वर्धापन दिन दरवर्षी ११ ऑक्टोबर रोजी साजरा करण्यात येतो. यंदा ११ ऑक्टोबर रोजी रविवार व साप्ताहिक सुट्टी असल्यामुळे मुख्य वर्धापन दिन कार्यक्रम सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे. महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारत, पिंपरी तसेच प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन प्रस्तावित आहे.

वर्धापन दिनाच्या पूर्वतयारी व नियोजनासंदर्भात महापौर रवि लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक घेण्यात आली. बैठकीस सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, कला, क्रीडा, सांस्कृतिक व पर्यटन समितीचे सभापती कैलास कुटे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, प्रभाग अध्यक्ष निखील बो-हाडे, नगरसदस्य राजू मिसाळ, विकास साने, निलेश तरस, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, उपायुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच शशिकांत झिंजुर्डे, उमेश बांदल, मंगेश कलापुरे, चंद्रशेखर गावडे, नितीन समगीर, लाला गाडे, विश्वनाथ लांडगे, राजाराम लांडे, मदन चिंचवडे, किशोर आठवाल, अनिल लखन आणि राकेश चव्हाण आदी उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड शहराच्या गेल्या ४४ वर्षांच्या विकासामध्ये महानगरपालिकेची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. औद्योगिक नगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराचा आधुनिक व विकसित शहराच्या दिशेने झालेला प्रवास हा नागरिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सामूहिक सहभागातून साध्य झाला आहे. या विकासप्रवासाचा आढावा घेण्यासोबतच आगामी काळातील शहराच्या गरजा लक्षात घेऊन नागरिककेंद्रित, पारदर्शक, गतिमान आणि गुणवत्तापूर्ण प्रशासन अधिक सक्षम करण्याचा संकल्प वर्धापन दिनाच्या निमित्ताने करण्यात येणार आहे.

महापौर रवि लांडगे म्हणाले, “पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा ४४ वा वर्धापन दिन हा शहराच्या विकासात्मक वाटचालीचा आढावा घेण्याबरोबरच या प्रवासात योगदान देणाऱ्या प्रत्येक घटकाच्या कार्याची दखल घेण्याचा महत्त्वपूर्ण प्रसंग आहे. नागरिकांचा सहभाग, लोकप्रतिनिधींचे सहकार्य आणि महानगरपालिकेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नातून शहराच्या विकासाला सातत्याने गती मिळाली आहे. आगामी काळात शहराच्या वाढत्या गरजा आणि नागरिकांच्या अपेक्षा लक्षात घेऊन अधिक सक्षम, गतिमान, पारदर्शक व नागरिकाभिमुख प्रशासन देण्यास प्राधान्य राहील. वर्धापन दिनाच्या निमित्ताने अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या योगदानाचा गौरव करण्यासोबतच विविध सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रमांमधून त्यांचा सहभाग वाढविण्यात येणार आहे.”

वर्धापन दिनानिमित्त नगरीचे शिल्पकार अण्णासाहेब मगर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. यासोबत रक्तदान शिबिर, महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी विशेष उपक्रम, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी चहापान व अल्पोपहार, कर्मचारी ऑर्केस्ट्रा, गुणवंत अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार तसेच विविध स्पर्धांतील विजेत्यांचा गौरव आदी कार्यक्रमांचे आयोजन प्रस्तावित आहे.

महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी पाककला व रांगोळी स्पर्धांसह विविध सांस्कृतिक उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

# प्रबोधनकारांच्या निर्भीड विचारांना अभिवादन; महापौर लांडगे यांच्याकडून पुष्पहार

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीत थोर समाजसुधारक, विचारवंत, लेखक आणि पत्रकार केशव सीताराम उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.**



यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शिक्षण समिती सभापती रविना अंघोळकर, महिला व बालकल्याण समिती सभापती राणीमाई पठारे, उपआयुक्त अण्णा बोदडे, लेखाधिकारी दीपक गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते मधुकर बच्चे यांच्यासह महानगरपालिकेच्या विविध विभागांतील अधिकारी, कर्मचारी तसेच उपस्थित मान्यवरांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

प्रबोधनकार ठाकरे यांनी आपल्या परखड आणि निर्भीड लेखणीच्या माध्यमातून समाजातील अनिष्ट रूढी, अंधश्रद्धा, जातीय विषमता आणि सामाजिक अन्यायाविरोधात सातत्याने आवाज उठविला. त्यांनी समाजातील चुकीच्या प्रथा आणि रूढींवर प्रखरपणे टीका करत विवेकवादी आणि परिवर्तनवादी विचारांचा पुरस्कार केला. समाजात विवेक, समता, स्वाभिमान आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. त्यांच्या निर्भीड विचारांनी आणि स्पष्ट लिखाणाने महाराष्ट्रातील समाजप्रबोधनाच्या चळवळीला नवी दिशा मिळाली.

पत्रकारिता, लेखन आणि समाजसुधारणेच्या माध्यमातून त्यांनी सर्वसामान्यांमध्ये जागृती निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. सामाजिक विषमता दूर करण्यासोबतच माणूस म्हणून प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा, यासाठी त्यांनी सातत्याने प्रबोधन केले. त्यांच्या विचारांमध्ये सामाजिक परिवर्तनासोबतच स्वाभिमान, सत्य आणि विवेक यांना विशेष महत्त्व होते.

प्रबोधनकार ठाकरे यांचे कार्य आणि विचार आजच्या पिढीसाठीही मार्गदर्शक व प्रेरणादायी आहेत. बदलत्या काळात समाजातील अंधश्रद्धा, विषमता आणि अन्यायाविरोधात विवेकपूर्ण भूमिका घेणे, तसेच समता आणि सामाजिक सलोखा मजबूत करणे आवश्यक आहे. त्यांच्या विचारांचा जागर समाजात कायम ठेवणे आणि सामाजिक परिवर्तनाची ही चळवळ पुढे नेणे, हीच प्रबोधनकारांना खरी आदरांजली ठरेल.

# स्थायी समितीत कोट्यवधींच्या खर्चांना हिरवा कंदील!

## महिला वसतिगृहासाठी २९.१४ कोटी; दिव्यांग पास, शिक्षण, सेवा अन् नागरी सुविधांसाठी मोठा निधी!

>> पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीच्या बुधवारी (दि. १६) झालेल्या बैठकीत विविध विकासकामे, नागरी सुविधा, शिक्षण, दिव्यांग कल्याण आणि पशुवैद्यकीय सेवांशी संबंधित कोट्यवधी रुपयांच्या खर्चांना मंजुरी देण्यात आली. वाकड येथील पीएमपीएल बस डेपोतील चार्जिंग स्टेशनसाठी वीज जोडणी घेण्यासाठी महावितरणला ३ कोटी ३१ लाख ११ हजार रुपये शुल्क अदा करण्यास समितीने मान्यता दिली. सभेच्या अध्यक्षस्थानी स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे होते.**




### दिव्यांग भवनच्या संचालक मंडळात पदाधिकाऱ्यांची वर्णी

मोरवाडी, पिंपरी येथील दिव्यांग भवन फाउंडेशनच्या संचालक मंडळात महापौर रवि लांडगे, स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे आणि विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांचा संचालक म्हणून समावेश करण्यात आला आहे. फाउंडेशनच्या संचालन मंडळाचे अध्यक्ष महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आहेत. याशिवाय अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, समाज विकास विभागाच्या उपायुक्त ममता शिंदे आणि दिव्यांग कक्षाच्या सहाय्यक आयुक्त निवेदिता घार्गे यांचीही संचालक म्हणून निवड करण्यात आली आहे.

वाकड येथील महापालिकेच्या जागेवर पीएमपीएल बस डेपो विकसित करण्यात येत असून, तेथे इलेक्ट्रिक बससाठी चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार आहे. या चार्जिंग स्टेशनला वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यक वीज जोडणीच्या शुल्कापोटी ३ कोटी ३१ लाख रुपयांहून अधिक खर्च करण्यात येणार आहे. त्याचबरोबर वाकड येथे महिलांसाठी वसतिगृह उभारण्यासाठी तब्बल २९ कोटी १४ लाख ३३ हजार ८४९ रुपयांच्या खर्चासही मंजुरी देण्यात आली. यासाठी चालू आर्थिक वर्षातील जमा-खर्च लेखाशीर्षामध्ये आवश्यक सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

क क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत महिला बचत गटांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या शून्य कचरा प्रकल्पाला ७ लाख २७ हजार रुपये खर्चासह मुदतवाढ देण्यात आली. शिक्षण मंडळाच्या प्राथमिक शाळांमध्ये बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही यंत्रणेच्या वार्षिक देखभाल व दुरुस्तीसाठी ४२ लाख ३७ हजार रुपयांच्या खर्चालाही मान्यता देण्यात आली.

दिव्यांग व्यक्तींना मोफत बसप्रवास पास देण्याच्या योजनेलाही समितीने मंजुरी दिली आहे. तसेच, ६० वर्षांवरील अंध व्यक्तींच्या सोबतीदारांना मोफत बसप्रवास पास देण्यात येतो. या योजनेंतर्गत महापालिकेने एकूण ३ हजार २९ जणांना पास दिले असून, १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या आर्थिक वर्षात त्यासाठी तब्बल ५ कोटी ३२ लाख ४० हजार ७४६ रुपये खर्च झाला आहे.

महापालिकेच्या विविध पशुवैद्यकीय रुग्णालये, ॲम्ब्युलन्स, डॉग व्हॅन आणि डॉग पार्क आदी ठिकाणी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी दोन वेगवेगळ्या एजन्सींमार्फत दोन वर्षे सेवा घेण्यात येणार आहे. त्यासाठी एकूण १० कोटी ७५ लाख ३६ हजार ४२२ रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली.

महापालिकेच्या विविध विभागांचे दैनंदिन कामकाज तसेच सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने मतदार याद्या व इतर आवश्यक कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती काढण्यासाठी २४ लाख ६४ हजार रुपयांच्या खर्चालाही मंजुरी देण्यात आली. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांतर्गत शहरातील मूलभूत नागरी सुविधांच्या विकासासाठी मिळालेल्या ५ कोटी रुपयांच्या अनुदानातून शाळांमध्ये प्रयोगशाळा व वाचनालये विकसित करणे, जीमची उपकरणे बसविणे तसेच रुग्णालयांसाठी वैद्यकीय उपकरणे खरेदी करण्याचे नियोजन आहे.

महापालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील २० बालवाडी शिक्षिकांना दरमहा १० हजार रुपये अनुदान देण्यात येते. त्यासाठी ११ महिन्यांसाठी २२ लाख रुपयांच्या खर्चासही समितीने मान्यता दिली. यासह विविध विभागांच्या आवश्यक खर्चांना स्थायी समितीने मंजुरी दिली. दिव्यांग भवन फाउंडेशनची स्थापना कंपनी कायद्यानुसार १ फेब्रुवारी २०२४ रोजी करण्यात आली असून, भवनाचे उद्घाटन तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ९ फेब्रुवारी २०२४ रोजी झाले. सुमारे २४ हजार चौरस फूट बांधकाम असलेल्या दिव्यांग भवनामध्ये २१ प्रकारच्या दिव्यांगांसाठी १७ हून अधिक प्रकारच्या उपचार व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

# पिंपरी-चिंचवडमध्ये डेंग्यूचा डंख; १५ दिवसांत ३८ रुग्ण पॉझिटिव्ह!

>> पिंपरी | प्रतिनिधी

**बदलत्या हवामानामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या १५ दिवसांत शहरात डेंग्यूचे तब्बल ३८ पॉझिटिव्ह रुग्ण आढळले आहेत. डेंग्यूसोबतच मलेरियाचेही दोन रुग्ण पॉझिटिव्ह आढळल्याने कीटकजन्य आजारांचा धोका वाढला आहे.**



महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, सप्टेंबर महिन्यात आतापर्यंत २१ हजार ४९७ संशयित मलेरिया रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे. यामध्ये दोन रुग्णांचे अहवाल पॉझिटिव्ह आले असून, त्यांना मलेरियाची लागण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्याचप्रमाणे ९०५ संशयित डेंग्यू रुग्णांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी तब्बल ३८ रुग्ण डेंग्यू पॉझिटिव्ह आढळले आहेत. त्यामुळे शहरात डेंग्यूच्या रुग्णसंख्येत झालेली वाढ आरोग्य विभागासाठी चिंतेचा विषय ठरत आहे.

पावसाने उघडीप दिल्यानंतर शहरातील वातावरणात सातत्याने बदल होत आहेत. कधी पाऊस तर कधी कडक ऊन, अशा बदलत्या वातावरणामुळे डासांच्या उत्पत्तीला पोषक परिस्थिती निर्माण होत आहे. पावसाळ्यात घरांच्या परिसरात, सोसायट्यांमध्ये, बांधकामांच्या ठिकाणी, मोकळ्या जागांवर तसेच विविध ठिकाणी पाणी साचते. या साचलेल्या पाण्यात डासांची पैदास होण्याची शक्यता वाढते. त्यातच नाले, गटारे आणि परिसरात साचलेला कचरा यामुळे डासांची उत्पत्ती वाढण्यास अनुकूल वातावरण निर्माण होते.

पाऊस थांबल्यानंतर नाल्यांमधील पाण्याचा प्रवाह कमी झाल्याने अनेक ठिकाणी पाणी आणि कचरा साचून राहण्याची शक्यता असते. यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढून डेंग्यू, मलेरिया आणि चिकनगुनियासारख्या कीटकजन्य आजारांचा धोका निर्माण होतो. त्यामुळे नागरिकांनी घरासह आपल्या परिसरात कुठेही पाणी साचणार नाही, याची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.

दरम्यान, कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने 'ब्रेक द चेन' ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासोबतच डासांची उत्पत्तीस्थळे शोधून त्यावर आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यावर भर दिला जात आहे. घरांमध्ये तसेच सार्वजनिक ठिकाणी साचलेल्या पाण्याची तपासणी करून डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

नागरिकांनी घराच्या परिसरात, गच्चीवर, कुंड्यांमध्ये, टाक्यांमध्ये, जुन्या वस्तू किंवा टायरमध्ये पाणी साचणार नाही, याची दक्षता घ्यावी. पाण्याची भांडी, टाक्या आणि इतर साठवणुकीची साधने नियमितपणे स्वच्छ करून झाकून ठेवावीत. तसेच परिसरात कचरा साचणार नाही आणि पाण्याचा निचरा व्यवस्थित होईल, याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे.

ताप, अंगदुखी, डोकेदुखी, अशक्तपणा, थंडी वाजणे किंवा इतर संशयास्पद लक्षणे जाणवल्यास नागरिकांनी स्वतःहून औषधे न घेता तातडीने वैद्यकीय तपासणी करून घ्यावी. डेंग्यू आणि मलेरियाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिका प्रशासनाच्या उपाययोजनांसोबत नागरिकांचा सक्रिय सहभागही महत्त्वाचा असल्याने, 'डासांची

# अजितदादांच्या आठवणींना गणेशोत्सवात उजाळा!

## दर्शन सोनवणेची तीन महिन्यांची मेहनत; गणेशभक्तांचे देखाव्याकडे लक्ष!

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवडमधील एका अनोख्या देखाव्याने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले आहे. भोसरीतील दर्शन सोनवणे या मायक्रोबायोलॉजीचे शिक्षण घेणाऱ्या तरुणाने दिवंगत अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा देणारी हुबेहूब प्रतिकृती साकारली आहे. अजित पवार गणपती बाप्पाला घेऊन येत असल्याचा प्रसंग या देखाव्यात उभारण्यात आला असून, त्यांच्या आठवणींना अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यात आले आहे. या देखाव्याची माहिती स्थानिक माध्यमांसह इतर वृत्तमाध्यमांनीही प्रसिद्ध केली आहे.**




अजित पवार यांच्या वाढदिवसापासून दर्शन सोनवणे यांनी या अनोख्या प्रतिकृतीच्या निर्मितीला सुरुवात केली. मायक्रोबायोलॉजीचे शिक्षण घेत असतानाही आपल्या कलागुणांना वेळ देत त्यांनी तब्बल तीन महिने सातत्याने मेहनत घेत ही हुबेहूब प्रतिकृती साकारली. प्रतिकृती अधिकाधिक जिवंत आणि वास्तवदर्शी दिसावी, यासाठी बारकाव्यांवर विशेष मेहनत घेण्यात आली आहे. विशेष म्हणजे, दर्शन यांचा राजकारणाशी कोणताही थेट संबंध नसून अजित पवार यांच्याबद्दल असलेल्या आदर आणि आपुलकीच्या भावनेतून त्यांनी हा उपक्रम हाती घेतला आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर साकारण्यात आलेल्या या देखाव्यात अजित पवार बाप्पाचे स्वागत करत असल्याचा प्रसंग उभा करण्यात आला आहे. अजित पवार यांच्या हातात गणेशमूर्ती असलेली प्रतिकृती लक्षवेधी ठरत आहे. त्यांच्या चेहऱ्यावरील भाव, वेशभूषा आणि देहबोली यामध्ये वास्तवदर्शीपणा आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी ही प्रतिकृती जिवंत व्यक्तिप्रमाणे भासत असल्याने नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे.

यासोबतच अजित पवार यांच्या निधनाशी संबंधित विमान अपघाताचा प्रसंगही देखाव्यात स्वतंत्रपणे साकारण्यात आला आहे. या प्रसंगाच्या माध्यमातून त्यांच्या आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. गणेशोत्सवाच्या आनंदाच्या वातावरणात हा भावनिक प्रसंग पाहताना अनेक नागरिक जुन्या आठवणींमध्ये रमून जात आहेत. या देखाव्यामुळे परिसरात भावनिक वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांकडून या संकल्पनेबाबत विविध प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

अजित पवार यांचे २८ जानेवारी २०२६ रोजी बारामती विमानतळावर झालेल्या विमान अपघातात निधन झाले. त्यांच्या निधनानंतरचा हा पहिलाच गणेशोत्सव असल्याने त्यांच्या आठवणींना उजाळा देणाऱ्या या देखाव्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. गणेशोत्सवातील देखाव्यांच्या माध्यमातून सामाजिक, सांस्कृतिक आणि भावनिक विषय मांडण्याची परंपरा असून, दर्शन सोनवणे यांनी आपल्या कलाकृतीतून अजित पवार यांच्या आठवणी जपण्याचा प्रयत्न केला आहे.

दर्शन सोनवणे यांच्या घरी उभारण्यात आलेला हा देखावा पाहण्यासाठी परिसरातील नागरिक, गणेशभक्त, युवक आणि अजित पवार यांचे चाहते मोठ्या संख्येने भेट देत आहेत. प्रतिकृतीसोबत छायाचित्रे काढण्यासाठी नागरिकांची विशेष उत्सुकता दिसून येत आहे. अनेक जण प्रतिकृतीचे बारकाईने निरीक्षण करत असून, दर्शन यांच्या कलाकौशल्याचे आणि तीन महिन्यांच्या मेहनतीचे कौतुक करत आहेत.

या संपूर्ण उपक्रमासाठी दर्शन सोनवणे यांनी स्वतःची कल्पकता, वेळ आणि मेहनत पणाला लावली. कोणताही राजकीय हेतू न ठेवता केवळ आदराच्या भावनेतून साकारलेली ही कलाकृती सध्या गणेशोत्सवातील चर्चेचा विषय ठरत आहे. एका तरुणाच्या कलात्मक दृष्टिकोनातून साकारलेली ही प्रतिकृती अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा देण्यासोबतच गणेशोत्सवातील वेगळ्या संकल्पनेचे उदाहरण ठरत आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये आरटीओचा दणका; ३९५ वाहनांवर कारवाई!

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड यांच्या वतीने १ ते १५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत वाहनांची विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत नियमबाह्य काळी फिल्म, फॅन्सी अथवा आकर्षक नंबर प्लेट, HSRP नंबर प्लेट नसलेली वाहने तसेच इतर राज्यात नोंदणीकृत लक्झरी ट्रॅव्हल्स बसेसची तपासणी करण्यात आली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर आरटीओने दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला.**



या विशेष मोहिमेत वाहनांच्या काचांवर नियमबाह्य पद्धतीने काळी फिल्म लावणाऱ्या वाहनांवरही कारवाईचा बडगा उगारण्यात आला. अशा वाहनांवर एकूण १६ चलन करण्यात आली. त्यापैकी सहा चलनांचा भरणा झाला असून, त्यातून ३ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. वाहनांच्या काचांवर निर्धारित नियमांचे उल्लंघन होईल अशा पद्धतीने काळी फिल्म लावल्यास चालक किंवा वाहनमालकावर कारवाई केली जाऊ शकते, हे या मोहिमेतून पुन्हा स्पष्ट झाले आहे. वाहनांच्या काचा अधिक काळ्या करण्यासाठी लावण्यात येणाऱ्या फिल्ममुळे वाहनाच्या आतील भागाची दृश्यमानता कमी होण्याबरोबरच वाहतूक सुरक्षेचाही प्रश्न निर्माण होऊ शकतो.

विशेष मोहिमेत सर्वाधिक कारवाई HSRP नंबर प्लेट नसलेल्या वाहनांवर करण्यात आली. आरटीओने अशा वाहनांवर तब्बल २७५ चलन केले. त्यापैकी १०६ चलनांचा भरणा झाला असून, त्यातून १ लाख ८ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. वाहनांची नंबर प्लेट शासनाने निर्धारित केलेल्या मानकांनुसार असणे आवश्यक आहे. मात्र, अनेक वाहनांवर अद्यापही जुन्या पद्धतीच्या किंवा नियमांनुसार नसलेल्या नंबर प्लेट आढळून येत असल्याने आरटीओकडून अशा वाहनांची तपासणी तीव्र करण्यात आली आहे.

HSRP नंबर प्लेटमध्ये वाहनाचा नोंदणी क्रमांक निर्धारित पद्धतीने दर्शविला जात असल्याने वाहनमालकांनी आपल्या वाहनाला HSRP नंबर प्लेट बसवून घेणे आवश्यक आहे. विशेष मोहिमेच्या माध्यमातून आरटीओने वाहनमालकांना नियमांचे पालन करण्याचा स्पष्ट संदेश दिला आहे. भविष्यातही अशा प्रकारच्या तपासणी मोहिमा राबविण्यात येण्याची शक्यता असून, वाहनमालकांनी कागदपत्रे आणि नंबर प्लेट नियमांनुसार आहेत की नाही, याची खात्री करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

वाहनांवर फॅन्सी नंबर प्लेट लावून शासनाने निर्धारित केलेल्या नमुन्यापेक्षा वेगळ्या पद्धतीने नोंदणी क्रमांक दर्शविणाऱ्या वाहनांवरही कारवाई करण्यात आली. या प्रकारात एकूण ५९ चलन करण्यात आले असून, त्यापैकी ३२ चलनांचा भरणा करण्यात आला. त्यातून २० हजार ५०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

काही वाहनांवर नंबर प्लेटवर अक्षरे, आकडे किंवा विविध चिन्हांचा वापर करून नोंदणी क्रमांक आकर्षक पद्धतीने दर्शविण्याचा प्रयत्न केला जातो. अशा प्रकारच्या नंबर प्लेटमुळे वाहनाचा क्रमांक स्पष्टपणे ओळखण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे वाहनांवर आकर्षक अथवा नियमबाह्य पद्धतीने नंबर दर्शविण्याऐवजी शासनाने निर्धारित केलेल्या नमुन्यानुसार नंबर प्लेट वापरणे आवश्यक असल्याचे आरटीओकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

या मोहिमेदरम्यान इतर राज्यांत नोंदणीकृत लक्झरी ट्रॅव्हल्स बसेसचीही विशेष तपासणी करण्यात आली. पिंपरी-चिंचवड आणि परिसरातून मोठ्या प्रमाणात लक्झरी ट्रॅव्हल्स बसेसची वाहतूक होत असल्याने त्यांच्या कागदपत्रांसह नियमपालनाची तपासणी करण्यात आली. या कारवाईत अशा वाहनांवर एकूण ४५ चलन करण्यात आली.

त्यापैकी २३ चलनांचा भरणा झाला असून, या कारवाईतून तब्बल ६ लाख ७७ हजार ७७० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

# ‘दगडूशेठ’ च्या चरणी केरळी वाद्यांचा निनाद!

## ढोल-ताशांसोबत केरळी पारंपरिक वाद्यांचा जल्लोष!

» पिंपरी | प्रतिनिधी

**श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने आयोजित गणेशोत्सवात यंदा भक्तीबरोबरच विविध प्रांतांच्या कला आणि संस्कृतीचा अनोखा मिलाफ पाहायला मिळत आहे. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती बाप्पाला केरळच्या पारंपरिक चेंदा मेलम वादनाने अभिवादन करण्यात आले. चेंदा या पारंपरिक तालवाद्याच्या दमदार आणि जोशपूर्ण वादनाने गणरायाचा परिसर दुमदुमून गेला. वादनाचा वाढता ताल, कलाकारांचा उत्साह आणि त्याला मिळालेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे गणेशोत्सवाच्या उत्साहात आणखी भर पडली.**



केरळच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेमध्ये चेंदा वाद्याला विशेष स्थान आहे. मंदिरांमधील धार्मिक सोहळे, उत्सव तसेच विविध पारंपरिक कार्यक्रमांमध्ये चेंदा मेलमचे सादरीकरण केले जाते. अनेक वादक एकत्रितपणे अत्यंत शिस्तबद्ध आणि तालबद्ध पद्धतीने हे वादन सादर करतात. वादनातील लय, ताल आणि कलाकारांचा परस्पर समन्वय हे चेंदा मेलमचे वैशिष्ट्य मानले जाते. याच पारंपरिक कलेचे दमदार सादरीकरण दगडूशेठ गणपतीच्या उत्सवात करण्यात आले.

चेंदा मेलमचे वादन सुरू होताच परिसरातील वातावरणात वेगळीच ऊर्जा निर्माण झाली. सुरुवातीला संयत असलेला ताल हळूहळू वेग घेत गेला आणि त्यानंतर कलाकारांनी एकसुरात केलेल्या दमदार वादनाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. चेंदा वाद्यांच्या निनादामुळे गणरायाच्या परिसरात भक्तिमय वातावरणाबरोबरच उत्साहाचेही वातावरण निर्माण झाले. भाविकांनी या आगळ्या-वेगळ्या सांस्कृतिक सादरीकरणाचा मनमुराद आनंद घेतला.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचा गणेशोत्सव हा पुण्याच्या सांस्कृतिक वैभवातील महत्त्वाचा भाग मानला जातो. या उत्सवाला दरवर्षी देशाच्या विविध भागातून भाविक येतात. त्याचबरोबर विविध राज्यांतील कलाकार आणि सांस्कृतिक समूहांनाही या उत्सवाच्या माध्यमातून आपली कला सादर करण्याची संधी मिळते. त्यामुळे गणेशोत्सवाच्या निमित्ताने धार्मिक श्रद्धेसोबतच देशातील विविध कला, परंपरा आणि संस्कृतींची ओळख पुणेकरांना होते.

महाराष्ट्राच्या गणेशोत्सवात ढोल-ताशा, लेझीम, झांजपथक यांसारख्या पारंपरिक वाद्यांना विशेष महत्त्व आहे. त्याच पार्श्वभूमीवर केरळमधील चेंदा मेलमचा दमदार ताल दगडूशेठ गणपतीच्या उत्सवात घुमल्याने हा अनुभव उपस्थितांसाठी विशेष ठरला. महाराष्ट्राच्या गणेशोत्सवातील जल्लोष आणि केरळच्या पारंपरिक मंदिर संस्कृतीतील चेंदा वादन यांचा सुंदर संगम यानिमित्ताने पाहायला मिळाला.

चेंदा मेलमच्या तालावर कलाकारांनी सादर केलेल्या वादनात त्यांचा अनुभव, कौशल्य आणि तालबद्धता स्पष्टपणे जाणवत होती. अनेक वादकांनी एकत्रितपणे वादन करताना साधलेला समन्वय उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होता. वादनाचा प्रत्येक टप्पा अधिक जोशपूर्ण होत गेल्याने भाविकांमध्येही उत्साह वाढत गेला. पारंपरिक वाद्यांच्या गजरात गणरायाला अभिवादन करण्याचा हा अनोखा सोहळा भाविकांसाठी संस्मरणीय ठरला.

या उपक्रमातून विविध राज्यांच्या सांस्कृतिक परंपरांमधील देवाणघेवाणीचे दर्शनही घडले. महाराष्ट्रात साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवात केरळच्या पारंपरिक कलेला स्थान मिळाल्याने दोन वेगवेगळ्या सांस्कृतिक परंपरा एकाच व्यासपीठावर आल्या. भाषा, वेशभूषा, वाद्ये आणि परंपरा वेगवेगळ्या असल्या तरी भक्ती आणि कलेच्या माध्यमातून विविध संस्कृती एकत्र येऊ शकतात, हे या कार्यक्रमातून अधोरेखित झाले.

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता कला, संस्कृती आणि सामाजिक एकोपा जपणारा उत्सव म्हणूनही आपले महत्त्व टिकवून आहे. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने आयोजित विविध उपक्रमांमधून या सांस्कृतिक परंपरांना व्यासपीठ मिळत आहे. त्यात केरळच्या चेंदा मेलमचे सादरीकरण ही आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण भर ठरली.

गणरायाच्या चरणी केरळी वाद्यांचा निनाद घुमत असताना उपस्थित भाविकांनी या सांस्कृतिक पर्वणीचा अनुभव घेतला. चेंदा मेलमच्या दणदणाटाने परिसरात निर्माण झालेला उत्साह आणि कलाकारांच्या दमदार सादरीकरणाने यंदाच्या गणेशोत्सवातील या कार्यक्रमाची वेगळीच छाप उमटली. भक्तीच्या वातावरणात घुमलेला केरळच्या पारंपरिक वाद्यांचा ताल आणि पुण्याच्या गणेशोत्सवाची उत्सवी परंपरा यांचा हा संगम उपस्थितांसाठी खास आकर्षण ठरला.

# FDAचा धडाका, १,६८३ किलो संशयित दुग्धजन्य साठा जप्त!

» पिंपरी | प्रतिनिधी

**सणासुदीच्या काळात मिठाई, दुग्धजन्य पदार्थ आणि खाद्यपदार्थांची मागणी वाढत असतानाच भेसळखोरांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (FDA) कारवाईचा धडाका सुरू केला आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या संशयित आणि निकृष्ट दर्जाच्या खाद्यपदार्थांवर लक्ष केंद्रित करत FDAने पुणे जिल्ह्यात विविध ठिकाणी धडक तपासणी केली. या विशेष मोहिमेत दौंड आणि मंचर परिसरातील दोन स्वतंत्र आस्थापनांवर छापे टाकून तब्बल १ हजार ६८३ किलो संशयित दुग्धजन्य साठा जप्त करण्यात आला आहे. याशिवाय पुण्यातील मार्केट यार्ड परिसरातील एका आस्थापनाचा परवानाही नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी रद्द करण्यात आला आहे.**



सणासुदीच्या काळात नागरिक मोठ्या प्रमाणावर दूध, खवा, पनीर, तूप, बटर, मिल्क पावडर तसेच यापासून तयार होणाऱ्या मिठाईची खरेदी करतात. त्यामुळे या कालावधीत भेसळयुक्त किंवा निकृष्ट दर्जाचे पदार्थ बाजारात येण्याची शक्यता लक्षात घेऊन FDAकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत खाद्यपदार्थांची तपासणी, नमुने घेणे, संशयित साठा ताब्यात घेणे आणि नियमभंग करणाऱ्या आस्थापनांवर कायदेशीर कारवाई केली जात आहे.

अन्न व औषध प्रशासनाने ११ सप्टेंबर रोजी पाटस (ता. दौंड) येथील एका आस्थापनावर छापा टाकला. या तपासणीदरम्यान मोठ्या प्रमाणावर दुग्धजन्य पदार्थांचा साठा आढळून आला. प्रशासनाने सुमारे ८ लाख ५० हजार ७०२ रुपये किमतीचा १ हजार ५१९ किलो साठा ताब्यात घेतला.

या साठ्यामध्ये म्हशीचे बटर आणि स्किम्ड मिल्क पावडरचा समावेश होता. संबंधित पदार्थांच्या वेष्टनावरील माहितीमध्ये त्रुटी आढळून आल्याने प्रशासनाने त्याची तपासणी केली. तसेच साठ्यात भेसळीचा संशय निर्माण झाल्याने संबंधित माल तातडीने ताब्यात घेण्यात आला. या प्रकरणात आवश्यक नमुने घेऊन पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

मोठ्या प्रमाणात दुग्धजन्य पदार्थांचा साठा आढळल्याने सणासुदीच्या काळात खाद्यपदार्थांच्या पुरवठा साखळीवर प्रशासनाचे लक्ष असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेषतः मोठ्या प्रमाणात माल साठवून ठेवणाऱ्या आस्थापनांची तपासणी वाढविण्यात आली आहे. यानंतर १३ सप्टेंबर रोजी मंचर (ता. आंबेगाव) येथे FDAच्या पथकाने दुसरी महत्त्वपूर्ण कारवाई केली. या आस्थापनाच्या तपासणीदरम्यान एकूण १६४ किलो दुग्धजन्य पदार्थ ताब्यात घेण्यात आले.

यामध्ये १३ हजार ७२० रुपये किमतीचा ४९ किलो खवा, ३१ हजार २०० रुपये किमतीचे १०४ किलो पनीर आणि ७ हजार ९२० रुपये किमतीचे ११ किलो तूप, असा एकूण साठा होता. या मालाची तपासणी केली असता तो निकृष्ट दर्जाचा असल्याचे आढळून आल्याने प्रशासनाने संबंधित साठा ताब्यात घेतला आहे.